# निवडणूक काळात सामाजिक माध्यमांचा व खोट्या बातम्यांचा वापर

प्रा.डॉ.बी.आर. कतुरवार
विभागप्रमुख ,
लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र
देगलूर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड

प्रस्तावना

एकविसाव्या शतकामध्ये मानवाने ज्ञान विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. स्वातंत्र्यानंतर भारतात स्वातंत्र्य , समता,न्याय, बंधुता, धर्मनिरपेक्षता लोक कल्याणकारी इत्यादी आदर्श मानवी मूल्यांचा स्वीकार करून संसदीय लोकशाही स्वीकारण्यात आली. लोकशाही शासन व्यवस्थेत नि:पक्ष व निर्भीड वातावरणात निवडणुका घेणे अत्यंत महत्वाचे असते.किंबहुना नि:पक्ष निवडणुकीवरच लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते.

अलीकडच्या काळात ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून ते भारतीय संसदेच्या निवडणुकीत प्रसार मध्यमानां अनन्यसाधारण महत्व प्प्राप्त झाले आहे. आज दिल्ली मुबंई सारख्या महानगरापासून ते आदिवसी दुर्गम भागात वास्तव्य करणाऱ्या कष्टकरी कामगार वर्गाच्या हातात स्मार्ट फोन दिसून येतो आहे. फेसबुक,गुगल, ट्विटर,इस्टाग्राम,व्हाटसअप व स्काईप यासरख्या समाज माध्यमानां **(Social Media)** अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. सोशियाल मिडिया हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. व्यक्ती सुशिक्षित असो अथवा निरक्षर असो त्याच्या हातात स्मार्ट फोन दिसून येत आहे.

सर्वासासाधारणपणे खाजगी व सार्वजिनक संवादासाठी वारण्यात येणाऱ्या मोबाईल **app** द्वारे वापरल्या जाणार्-या साधनांना सोशियाल मिडिया असे म्हंटले जाते. भारतातील सर्व प्रादेशिक भाषा सोशल मिडियासाठी उपलब्ध असल्यामुळेच त्या अधिक लोकप्रिय झाले आहेत. त्यामूळे ग्रामपंचायतीच्या निवडनुकीपासून ते राष्ट्रपतीच्या निवडणुकीमध्ये समाज मिडिया महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे,

# सामाजिक माध्यमावर नियंत्रण

## 1) तहसील कार्यालयात स्वतंत्र आय.टी. नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा. :-

एकविसाव्या शतकामध्ये माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये मानवाने नेत्रदीपक क्रांती घडून आणली आहे. या माहिती व तंत्रज्ञानाचा प्रभाव मानवी जीवनाच्या सर्व पैलूवर पडलेला आहे. साहजिकच लोकशाहीशासन व्यवस्था, सर्व राजकीय पक्ष व निवडणूक यंत्रणा इत्यादी संस्थेवर देखील सामाजिक प्रभाव पडलेला आहे. जागरूक समाजाच्या व सशक्त लोकशाहीच्या निर्मितीमध्ये समाज माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण बनली आहे.परतू अनेकदा काही राजकीय पक्ष ,उमेदवार व कार्यकर्ते खोटी व चुकीची माहितीई,फोटो शेअर करीत असतात. त्यामुळे एखाद्या पक्षाची अथवा उमेदवाराची बदनामी केली जाते. ज्याप्रमाणे निवडणूक आचारसंहिता लागू झाली की वाहनांची तपासनी करण्यासाठी पोलीस बंदोबस्त लावला जातो त्याप्रमाणे प्रत्येक तहसील कार्यालयात स्वतंत्र आय.टी. नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा.

# सामाजिक माध्यमावर नियंत्रण

## २) खोटी बातमी दिल्याचे सिद्ध झाल्यास त्याच्या पत्रकारितेस प्रतिबंध घालण्यात यावा.

लोकशाहीचा पाया मजबूत व भक्कम बनविण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असते. परंतु अनेकदा असे निदर्शनास येते की ठराविक वर्तमान पत्र विशिष्ट राजकीय पक्षाच्या बातम्यांना अधिक प्रसिद्धी देत असते. अर्थात बातमीदाराच्या प्रामाणिकतेवर बातमीतील सत्यता अवलंबून असते. काही वेळा खोटी बातमी प्रसिद्ध केली जाते त्यामुळे नागरिकाच्या मनात संभ्रम निर्माण होतो. एखाद्या उमेदवाराला बातमीचा प्रतिकूल परिणाम देखील भोगावा लागतो. त्यामुळे निवडणूक काळात जर कोणत्याही वर्तमानपत्राच्या बातमीदाराने खोटी बातमी दिल्याचे सिद्ध झाल्यास त्यासपत्रकारितेस प्रतिबंध घाल्यात यावा

# सामाजिक माध्यमावर नियंत्रण

## ३) समाज माध्यमांचा जबाबदारीने वापर करावा.:-

**अनेकदा Whats App ग्रुपमधून अथवा व्यक्तिगत स्वरुपात आलेला Massage न वाचता पुढे फार्वर्ड करण्याचे नागरिकांना व्यसन लागलेले असते, त्यातून अनेकदा वादविवाद उद्भवतात त्यांमुळे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला जातो व सबंधितावर कायदेशीर कार्यवाहीदेखील केली जाते. त्यासाठी एखाद्या व्यक्तीकडे प्राप्त massage सत्य व कायदेशीर आहे किंवा नाही याची खात्री करावी व चुकीचा massage प्राप्त झाला तर तो त्वरित डिलीट करण्याची सवय लावून घेतली पाहिजे.**
थोडक्यात **समाज माध्यमांचा प्रत्येकाने जबाबदारीने वापर करावा.**



घोड्याला तुम्ही पाण्यावर नेऊ शकता; पण पाणी पिण्यास बाध्य करण्यासाठी मात्र त्यांना सुयोग्य पद्धतीने प्रेरित केले तरच ती पाणी पिती.